महाराष्ट्रातील निवडक भजन परंपरांचे सांगीतीक दृष्टीने विश्लेषणात्मक अध्ययन

प्रस्तावना :-

लाऊनी मृदुंग श्रुती टाळ घोष |
सेऊ ब्रम्हरस आवडीने || संत तुकाराम गाथा (११७६)

ॐ हा मुळनाद असून तो वेदाचा मुलमंत्र मानला जातो. संगीताचे मुळ सामवेदात मानले आहे. नाद हे ईश्वराचे प्रतिक आहे म्हणून संगीताला नादब्रम्ह म्हटले जाते. हेच नाद तत्व चराचरात सामावले आहे. याच नादापासून भजन परंपरा वेगळ्या कशा राहतील? अर्थातच "नाद व लय" हे सर्व भजन संप्रदायातील मुख्य गाभा आहे. संगीत हे भारतीय अध्यात्मीक संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे कारण भारतीय संस्कृतीतील प्रथा, परंपरा, चालीरिती या सर्वांमधून परमेश्वराशी जवळीक साधण्याकरीता भजन, प्रार्थना, आराधना, ध्यानधारणा इत्यादी मुख्य मार्गाचा अवलंब केला जातो.

भारत ही संत-महंतांची व पंथ सांप्रदायाची अलौकिक परंपरा असलेली भूमी आहे अशा या विविधतेने नटलेल्या देशात विविध पंथ, संप्रदायाच्या उगमासंदर्भात एकनिश्चितता आढळून येत नाही परंतु प्राचीन उपनिषीदे, वेद, महाकाव्य इत्यादी ग्रंथामधून भजनसंदर्भात माहिती आढळते. भजन हा गीतप्रकार भिन्न - भिन्न प्रांतानुसार स्थल-काल-परत्वे भिन्नभिन्न प्रकारे सादर केला जात असताना दिसतो भारतातील विविध संतांनी विविध प्रकारच्या विविध सांप्रदायातील विविध रचना तयार केल्यामुळे विविध भजन परंपरा अस्तित्वात आल्या. उदा. महाराष्ट्रात वारकरी भजन सांप्रदाय, खंजेरी भजन, चक्रीभजन, अवधूतीभजन, (दत्त व कृष्णाजी महाराज) शक्तीभजन (देवीभजन),

रामदासी भजन (स. रामदास), गानपत्य भजन (सं. रामदास - एकनाथ म. रचना), उत्तरप्रदेशात - हवेली संगीत, कबीरभजने इत्यादी गुजरात - राजस्थान - मीराभजन, मध्यप्रदेश - निगुणीभजन, पंजाब - गुरुनानक भजन इत्यादी सारख्या अनेक भजन परंपरा अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

"महाराष्ट्र ही संतांची भुमी आहे" ज्ञानदेवापासून - संत तुकारामापर्यंतचे अनेक संत तसेच आधुनिक संत तुकडोजी महाराज, संत गजानन महाराज, गुलाब महाराज, श्रीकृष्ण महाराज सावंगा विठोबा इत्यादी विविध सांप्रदायातील संतमंडळीने केलेले कार्य मौलीक आहे भजनांच्या माध्यमातून उपरोक्त संतांनी राष्ट्रीय - जागतीक - अध्यात्मीक - धार्मिक - सामाजिक स्तरावर जनजागृती केली आहे महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाडामध्ये सुध्दा विविध भजन परंपरा आढळून येतात.

२. शोधकार्याचे प्रयोजन :-

माझा जन्म मराठवाड्यातील हिंगोली जिल्हयांतील लहानशा गावी झाला. अध्यात्मीक वातावरण असलेल्या अर्थातच वारकरी संप्रदायाचे वातावरण लाभलेल्या कुटूंबात झाला. लहानपणापासूनच भजनकिर्तनात रमल्यामुळे पुढे शालेयशिक्षणाबरोबरच उच्च संगीत शिक्षणाची जिज्ञासा होती. त्यामुळे २००३ साली संगीत विषयात पदवी सन २००५ साली पदव्युत्तर संगीत शिक्षण पूर्ण केले. सध्या मी शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व्दारा संचलीत जिजामाता महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापक म्हणून फेब्रु - २००९ पासून कार्यरत आहे. भजन या विषयात विशेषत: रुची असल्यामुळे तसेच जन्मभूमी मराठवाडा व कर्मभूमी विदर्भ असा दुहेरी संगम घडून आल्यामुळे दोन्ही ठिकाणी भजनांच्या विविध भजन परंपरा आढळल्या असे म्हणतात की, विशिष्ट प्रांत बदलला की, बोलीभाषा बदलते तसेच काहीसे मला भजन परंपरेतील सादरीकरणांच्या बाबतीत दिसून आले. ह्याच नाविण्यपूर्ण जिज्ञासेतून " महाराष्ट्रातील निवडक भजन परंपरांचे सांगीतीक दृष्टीने विश्लेषणात्मक अध्ययन " या विषयावर शोधकार्य करण्याचे प्रयोजन केले.

३. संशोधन विषयाचे महत्व :-

१. सध्याचा संगीत श्रोतावर्ग मग तो भजनातील असो वा शास्त्रीय - उपशास्त्रीय संगीतातील असो तो त्या-त्या प्रकारातील Spacilization कडे वळताना दिसतो. म्हणून भजन क्षेत्रात करीअर करु इच्छीणाऱ्या तसेच समाजातील सर्वसामान्यांना संशोधनाकरीता निवडलेले निवडक भजन सांप्रदाय व त्यांची शैली, विशेषता इत्यादी. एकत्रीतरित्या मार्गदर्शक ठरतील.

२. विविध भजन सांप्रदायातील विविध गीतप्रकार उदा. फुगड्या, गौळण, भारुड, यासारखे भिन्नप्रकार लोप पावू नयेत, व्यक्तीच्या शारिरीक - मानसिक आरोग्यास उपयुक्त असे हे विभिन्नप्रकार या संशोधनाच्या रुपाने जोपासले जातील.

३. ज्याप्रमाणे Music Theoryphy व्दारे रुग्णांना शांती मिळतांना दिसते त्याचप्रमाणे संशोधनाकरीता निवडलेला अवधुती सांप्रदाय ही मनोरुग्णांकरीता संजवनी असल्याचे दिसून येते.

४. वर उल्लेख केल्याप्रमाणे अवधुती सांप्रदायातील भजने आंतरशाखीय संबंधाने Interdisciplinery दृष्टीने संगीत व मानसशास्त्र, संगीत आणि आरोग्य इ. अभ्यासास उपयुक्त ठरेल.

४. संबंधीत साहित्याचा मागोवा :-

संशोधनाकरीता निवडलेल्या विषयाशी संबंधीत प्रत्येकी भजन संप्रदायावर आधारीत साहित्य प्रसिध्द आहे त्यामुळे उपलब्ध साहित्याव्दारे निवडक विभीन्न भजन परंपरांचे (शैली) साहित्यीक व सौदर्यात्मक दृष्टीने सांगीतीक अध्ययन केले जाणार आहे वारकरी, चक्री, खंजेरी आणि अवधुती भजनांचे गायन - वादन अनेक गायक कलावंत करीत असतात मात्र या चारही भजनांच्या परंपरा शैली आगळ्यावेगळ्या आहेत अशा या भजन परंपरांवर प्रकाशीत अनेक पुस्तकांमध्ये या विषयाबद्दल काही उल्लेख आलेले आहेत. त्यामध्ये वारकरी सांप्रदायाचा इतिहास डॉ. विकास कदम, पाच भक्ती सांप्रदाय कै. र.रा.गोसावी, अवधुती भजन भविष्यवाणी विठ्ठलराव घाटोळ, खंजेरी भजन - ग्रामगीता तसेच भजनप्रभाव - श्री. गुलाबराव खवसे, चक्रीभजन - मराठवाड्यातील अभीजात संगीत - अंजली मालकर इत्यादी प्रमुख आहेत. तसेच उपलब्ध असलेले इतर संग्राहात्मक लेख संगीतअंक इत्यादी सर्व आवश्यक त्या साहित्याचा मागोवा घेतला जाईल.

५. गृहितके :-

१. संशोधनासाठी निवडलेल्या सर्व सांप्रदायातील भजनाचे स्वरुप संगीत रचना व त्याची वैशिष्टये अभ्यासकासमोर येतील.

२. सांप्रदायातील भजनाच्या चालीमध्ये रागाचा, मेलोडी, तसेच ज्या ज्या घटकांचा समावेश झाला त्याचे तुलनात्मक विश्लेषण संशोधनाच्या पध्दतीने पुढे येईल.

३. प्रचलित व अप्रचलित रागांचा केलेला वापर भजनाव्दारे कसा व्यक्त झाला हे अभ्यासकांना कळेल तथापि ते लोकप्रिय होतील.

४. संशोधनासाठी निवडलेल्या सर्व सांप्रदायातील व्यक्तींनी आपल्या भजनामध्ये कोणकोणत्या साधनांचा उपयोग केला ती सर्व साधने सर्व सामान्यांना कळतील.

५. भजनातील शब्दांचा भावार्थ स्वरांच्या माध्यमातून लोकांपर्यत पोहचविण्यासाठी भजन गायकांनी गायलेल्या स्वर रचना व त्यासाठी निवडलेले अभंग अर्थात शब्द त्याची सकारण मिमांसा पुढे येईल.

६. संशोधनाची उद्दिष्टये :-

प्रस्तुत संशोधन कार्याकरीता प्रामुख्याने पुढील उद्देश विचाराधीन आहेत.

१. निवडक भजन पंरपराअंतर्गत संत साहित्यातील विभिन्न रचनामधील सांगीतीक पक्ष अभ्यासणे.

२. निवडलेल्या प्रत्येक भजन परंपरेतील गीतानुरुप ताल लयीच्या आधारे भावपक्ष अभ्यासणे.

३. प्रत्येक निवडक भजन सांप्रदायाचा इतर सांप्रदायाशी असलेला सहसंबंध अभ्यासणे.

४. निवडक सांप्रदायातील निवडक महत्वपूर्ण रचनांना स्वरलीपीबध्द करणे.

५. प्रत्येक सांप्रदायातील कार्यकरणाऱ्या तळागाळातील संगीत कलाकारांचा शोध घेणे.

७. संशोधनाची गरज :-

संशोधनाकरीता निवडलेल्या भजन शैलीमध्ये नाद व लयतत्व समान आहे याउलट स्थलकालपरत्वे सादीकरणातील फरक आढळतो अशा याविविध शैलीवर एकत्रीतरित्या संशोधन होऊन त्याचे विश्लेषण करण्याची गरज मला याकरीता वाटते की,

भजन या गीत प्रकारावर सखोल असे संशोधन कार्य करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

८. संशोधनाचे फायदे :-

१) विविध भजन शैलीचा एकत्रीत अभ्यास करायला अभ्यासकांना सोपे जाईल.

२) सांगीतीक साहित्यात भर पडेल.

३) भजनाच्या विविध पैलूचे दर्शन होईल.

९. संशोधन पध्दती

प्रस्तृत अध्ययनामध्ये ऐतिहासिक पध्दती, मुलाखत, प्रश्नावली, भजन गायक, (संगीतकार) च्या मुलाखती, तसेच विषयाला लागणाऱ्या आवश्यक त्या संशोधन पध्दती व साधनांचा उपयोग केल्या जाईल.

१. ऐतिहासिक पध्दती

भजनाच्या सांगीतिक परंपरेचा आरंभ, विकास, कालौघात झालेले भजन पध्दतीतील सांगितीक बदल, भजन संप्रदायाचे योगदान इ. चा थोडक्यात आढावा घेण्यात येईल.

याकरीता ध्वनीमुद्रिका, ध्वनीचित्रफीती व इतर आवश्यक साहित्याच्या माध्यमातून भजने मिळवून त्याचा अभ्यास केला जाईल.

२. विश्लेषणात्मक पध्दती

संशोधनासाठी निवडलेल्या गीतांच्या काव्याचा अर्थ, भाषिक वैशिष्ट्य, भाषिक सौंदर्य, शब्दांचा प्रयोग, साहित्यीक मुल्यमापन, छंद अलंकार इत्यादी.

तसेच गितासाठी वापरलेले राग रागमिश्रण, ताल व लयकारी वाद्य इत्यादीचे सांगीतिक विश्लेषण करण्यात येईल.

३. चिकित्सक पध्दती

वरीलप्रमाणे विश्लेषण केलेल्या भजनांच्या गितामधील सौंदर्याचे चिकित्सक अध्ययन करण्यात येईल.

४. तुलनात्मक पध्दती

चक्री भजन, वारकरी भजन, अवधुती भजन व खंजिरी भजन इत्यादी भजन परंपरेचे तुलनात्मक अध्ययन करण्यात येईल.

५. मुलाखत पध्दती

प्रस्तुत भजन परंपरेतील गायक, वादक, संगीत संयोजक तसेच गुरु शिष्य परंपरेतील गायक वादकांच्या मुलाखती घेऊन त्याचे विश्लेषण केले जाईल.

६. विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके व वृत्तपत्रांचा आधार घेण्यात येईल.

७. विविध संकेतस्थळांचा उपयोग घेण्यात येईल.

संशोधन आराखडा

विदर्भ - मराठवाड्यातील निवडक भजन परंपरांचे सांगीतीक दृष्टीने विश्लेषणात्मक अध्ययन

(वारकरी भजन, चक्री भजन, खंजेरी भजन, अवधूती भजन)

सदर प्रबंधाची रचना करताना खालीलप्रमाणे एकूण पाच प्रकरणाची योजना केलेली आहे.

प्रकरण १ ले - भजनाच्या सांगीतिक परंपरेचा उद्‌गम ते विकास (परंपरा)

(१) निर्मिती व उगम

(२) प्रचारक व पुरस्कर्ते

(३) आजपर्यंतची परंपरा व सद्यस्थीती

प्रकरण २ रे -भजन संप्रदायाचे स्वरुप व सादरीकणाच्या पध्दती

(१) परंपरेवर आधारीत स्वरुप / पध्दती

(२) लोकसंगीतावर आधारीत स्वरुप / पध्दती

(३) शास्त्रीय पध्दतीवर आधारीत स्वरुप / पध्दती

(४) प्रदर्शनावर आधारीत स्वरुप / पध्दती

प्रकरण ३ रे -भजन सांप्रदायातील साम्य व भेद आणि सांप्रदायातील सह संबंध

१) साम्य

(१) भाषिक समानता (२) धार्मिक अनुष्ठान

(३) सांगीतिक आधार (४) लोकजागृती व जनसेवा हा उद्देश

२) भेद

(१) सादरीकरणाच्या दृष्टीने   (२) पारंपारीक दृष्टीने

(३) काव्यात्मक दृष्टीने   (४) सांगितीक दृष्टीकोन

३) **संप्रदायातील सहसंबंध**

(१) सांप्रदायाचा भजन पध्दतीवर झालेले परीणाम

२) भजनाच्या माध्यमातुन संप्रदायात झालेले बदल,परिवर्तने,विकास इ

प्रकरण ४ थे - सांप्रदायाच्या प्रचार प्रसाराची माध्यमे

(१) शिक्षण प्रशिक्षण संस्था

(२) धार्मिक व सांगितीक ग्रंथ इ.

(३) प्रसार माध्यमे - रेडीओ, दूरदर्शन, विविध चॅनल, इंटरनेट, वृत्तपत्रे, मासिके,साप्ताहिके.

प्रकरण ५ वे - संप्रदायाची धार्मिक प्रतिष्ठाने व आयोजक

(१) मंदीरे व संस्थान, यात्रा, उत्सव

(२) भजनी मंडळे (पुरुष व महिला तसेच बालगट)

(३)सांस्कृतिक संस्थान व संघटना

प्रकरण ६ वे - उपसंहार

या प्रकरणात या अधीच्या प्रकरणातुन मिळालेल्या नविन ज्ञानाची अन्वयार्थक मांडणी केली जाईल.

प्रकरण ७ वे - निष्कर्ष

या प्रकरणात प्राप्त माहितीचे यथायोग्य पध्दतीने विश्लेषण करुन अंतिम निष्कर्षप्रत पोहचले जाईल.

परिशिष्टे

टिप :- उपरोक्त संशोधन आराखड्यामध्ये बदल अपेक्षीत आहेत.

११. विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :-

संशोधनाकरीता निवडलेल्या विषयाअंतर्गत मी वारकरी भजन, चक्रीभजन, खंजेरीभजन, आणि अवधुती भजन या भजनपरंपरा अभ्यासाकरीता निवडल्या आहेत. आतापर्यत एकत्रीतरित्या निवडक भजन परंपरेवर (शैलीवर), विश्लेषणात्मक अध्ययन हा विषय संशोधनाकरीता घेतलेला नाही. वारकरी व खंजेरी भजनावर वेगळ्या अंगाने वेगळ्या विषयावर संशोधन झाल्याचे तसेच चालू असल्याचे आढळते. याउलट अवधुती भजन व चक्री भजन यावर संशोधन झालेले आढळून येत नाही. या दोन्ही बाजूचा आढावा घेऊन संबंधीत विषय मी संशोधनाकरीता निवडला आहे. या विषयाच्या अनुषंगाने मी ह्या प्रत्येक भजन परंपरा स्वतंत्र असून सुध्दा त्यामधील वेगळेपण अर्थातच वेगवेगळ्या शैलीची तुलना वैशिष्टये, सहसंबंध (Co-Relation) एकमेकांवरील प्रभाव इत्यादी गोष्टी कशा वेगळ्या आहेत व या भजन परंपरामध्ये काय साध्य आहे याचे विश्लेषण संशोधनात्मक पध्दतीत मांडणार आहे.

यां संशोधनाचे कार्यक्षेत्र जरी महाराष्ट्र हे असले तरीही संशोधन विषयाकरीता अत्यंत आवश्यक अशा निवडक महत्वपूर्ण ठिकाणांची निवड केली जाईल.

उदा. खंजेरी भजन, अवधुती भजन (विदर्भ)

वारकरी, चक्रीभजन (मराठवाडा, प.महाराष्ट्र, विदर्भ) थोडक्यात मराठवाड्यातील विदर्भातील पश्चिम महाराष्ट्रातील निवडक ठिकाणाची निवड केली जाईल.

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील निवडक भजन परंपरांचे सांगीतीक दृष्टीने विश्लेषन याचाच आढावा घेते.

निवडक भजन परंपरेचे विश्लेषनात्मक (तुलनात्मक) अध्ययन

अ.क्र.	विषय	वारकरी	चक्री	खंजेरी	अवधूती
१	स्वरुप	परंपरेवर आधारीत	शास्त्रीय संगीतावर आधारीत	लोकसंगीतावर आधारीत	धूनप्रधान व लोकसंगीतावर आधारीत
२	ईश्वरभक्ती	विठ्ठल व सर्व संत	वारकरीप्रमाणे सर्व संत	तुकडोजी महाराज निगूर्ण (गुरुदेव)	अवधूत महाराज निगूर्ण
३	रचना (काव्य)	मराठी, हिंदी	मराठी, हिंदी	मराठी, हिंदी, संस्कृत	मराठीतच
४	वाद्यातील फरक (उपयोग)	पखवाज (मृदंग टाळ विणा) सद्यस्थितीत हार्मोनिअम, तबला याचाही उपयोग केला जातो	हार्मोनिअम, तबला, तंबोरा, मृदंग, टाळ, विणा	खंजेरी, टाळ, तबला, हार्मोनिअम, एकतारी कधी कधी चिपळ्या	ढोलक, झांजेचे मोठे टाळ, हार्मोनिअम कधी कधी विणा
५	सादरीकरणातील स्वरुप भेद रागभेद	परंपरेने साध्या तसेच रागदारीवर आधारीत चाली	संपूर्णतः रागदारी रागदारीच्या बंदीशी तराणे चक्रधार त्रिवट सरगम, तीहाई नवहाक्का इत्यादीयुक्त	चित्रपट, संगीतावर आधारीत, लोकसंगीतावर तसेच स्थल काल परत्वे चालीचा उपयोग	परंपरेच्या चाली अर्थातच लोक संगीतावर आधारीत धूनप्रधान चाली

			चालीचा वापर		
६	तालातील भेद तालभेद	पूर्वी दिपचंदी, धुमाळी, केरवा, भजनी ठोका, ठायी धुमाळी इत्यादी तालांचा उपयोग	वारकरीतील सर्व तालांबरोबरच रुपक, झपताल, त्रिताल, इत्यादी तालांचा लयकारी सह उपयोग	दादरा, केरवा, त्रिताल, रुपक, धुमाळी, इत्यादी तालासह तोडा, मुखडा, रेला, परन, कायदे, तिहाई इत्यादीसह विशिष्ट पटींमध्ये खंजेरीवादनाचा प्रयोग	केरवा भजनी
७	अधिष्ठान	मुर्तीपूजेला स्थान वारकरी परंपरेतील सर्व संत	मुर्तीपूजेला स्थान वारकरी परंपरेतील सर्व संत	फोटो व गादी तकीयाचा वापर, मुर्तीपूजा नाही	फोटो व गादी तकीयाचा वापर, मुर्तीपूजा नाही
८	प्रचार प्रसार	दिवसें दिवस प्रमाणात वाढ	वाढत आहे	वाढत आहे	विशिष्ट प्रदेशातच

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

कला व वाङ्‌मय विद्याशाखे अंतर्गत संगीत विषयात आचार्य पदवी (Ph.D) करीता करावयाचा संशोधन आराखडा.

◈ संशोधन विषय ◈

महाराष्ट्रातील निवडक भजन परंपरांचे सांगीतीक दृष्टीने विश्लेषणात्मक अध्ययन

◈ संशोधक ◈

प्रा. गजानन मारोतराव लोहटे

संगीत विभाग

जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा.

◈ मार्गदर्शक ◈

डॉ. राम बोरगावकर

संगीत विभाग प्रमुख

सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

कला व वाङ्‌मय विद्याशाखे अंतर्गत संगीत विषयात आचार्य पदवी (Ph.D)
करीता करावयाचा संशोधन आराखडा.

◈ संशोधन विषय ◈

महाराष्ट्रातील निवडक भजन परंपरांचे सांगीतीक दृष्टीने विश्लेषणात्मक अध्ययन

◈ संशोधक ◈

प्रा. गजानन मारोतराव लोहटे

संगीत विभाग

जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा.

◈ मार्गदर्शक ◈

डॉ. राम बोरगावकर

संगीत विभाग प्रमुख

सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर

प्रकरण ६

उपसंहार

या प्रकरणात या आधीच्या प्रकरणातून मिळालेल्या नविन ज्ञानाची अन्वयार्थक मांडणी केली जाईल.

प्रकरण ७

निष्कर्ष

या प्रकरणात प्राप्त माहितीचे यथायोग्य पध्दतीने विश्लेषण करुन अंतिम निष्कर्षाप्रत पोहचले जाईल.

परिशिष्ट

संशोधक
प्रा. गजानन मारोतराव लोहटे
संगीत विभाग
जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा.

मार्गदर्शक
डॉ. राम बोरगावकर
संगीत विभाग प्रमुख
सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर